I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 323-325 e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal OPEN ACCESS Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# स्त्रियांचे दुरिकरण आर्थीक विकासाला मारक

श्री. संतोष ए. कावरे

सहा. प्राध्यापक, समाजशास्त्र विभागप्रमुख
डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम चंद्रपूर
*Corresponding Author: kaware12sa@gmail.com

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 30.03.2022

**सारांश :**

प्रस्तुत विषयाच्या संदर्भात आजच्या युगामध्ये समाज रथाची दोन चाके म्हणून स्त्री आणि पुरूष यांच्याकडे बघितले जाते. देशाच्या विकासामध्ये सुध्दा या दोन घटकांचे योगदान महत्वाचे असल्याचे दिसून येते. तरीही आज स्त्रियाबद्दल विचार केला असता आर्थिक क्षेत्रामध्ये त्यांचे स्थान कमी असल्याचे आढळते. कारण सुरवातीलाच स्त्रियांचे कार्यक्षेत्र फक्त चुल आणि मुल एवढेच आहे असे ठरविण्यात आले पुरूषप्रधान संस्कृतीमध्ये त्यांचे स्थान कुठेतरी हरवल्यासारखे दिसुन आले पण भारतामध्ये घडुन आलेल्या सामाजिक सुधारणा, स्त्रियांच्या हक्काविषयी घडुन आलेल्या सामाजिक चळवळी स्त्री स्वांतंत्र्याविषयीचे भारतीय आणि पाश्चात्य विचारवंताचे, समाजसुधारकांचे योगदान यातून स्त्रियांना अनेक संधीची दारे उघडी झालेली आपल्याला दिसून येते तरीही आर्थिक क्षेत्रामध्ये त्यांचे स्थान आर्थिक विकासातील स्त्रीयांची वंचीतता ही या क्षेत्राच्या विकासामध्ये अडथळा आणू शकते. त्यामुळे आर्थिक क्षेत्रामध्ये स्त्रियांचा सहभाग वाढविणे अत्यंत महत्वाचे असल्याचे आपणास यातून कळते.

जोपर्यंत आपण स्त्रियांचे केवळ आर्थीकच नव्हे तर सामाजिक, राजकीय, धार्मीक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात मोठया प्रमाणात सामीलीकरण करून घेणार नाही. तोपर्यंत देशाचा सर्वांगिण विकास झाला असे आपणास म्हणता येणार नाही म्हणुन ज्याप्रमाणे कौटुंबिक कार्यात स्त्री पुरूषांच्या बरोबरीने आर्थीक कार्यात सहकार्य करून आपला महत्वाचा सहभाग दर्शवीत असते. त्याचप्रमाणे देशाच्या विकासात सुध्दा तिला बरोबरीने सामील करून घेणे काळाची गरज आहे. जर तिला या कार्यातून दूर करण्याचा प्रयत्न झाला तर ते नक्कीच आर्थीक विकासात मारकच ठरेल.

**बीजशब्द :** आर्थीक विकास, महिला सक्षमीकरण, स्त्री– पुरूष समानता.

**प्रस्तावना :**

भारतीय आर्थिक विकासाचा विचार करता स्वातंत्र्यपूर्व काळ आणि स्वातंत्र्योत्तर काळ अशी विभागणी करावी लागेल. त्यातल्या त्यात या आर्थिक विकासात महिलांची भूमिका काय आहे. हे सुध्दा विचारात घेणे महत्वाचे ठरते. खऱ्या अर्थाने भारत विकसनशिल राष्ट्र म्हणुन उदयास येत असतांना मात्र महिलांच्या स्थितीत विशेष सुधारणा झाल्याचे दिसुन येत नाही. स्त्रियांच्या विकासाकरीता भारतीय राज्यघटनेने मूलभूत अधिकार दिलेले आहेत. आज सर्वच क्षेत्रात महिला आपले योगदान देताना आढळते तरीसुध्दा स्त्रियांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन बदलला दिसुन येत नाही. जोपर्यंत महिलांना आपण पूर्णपणे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेणार नाही. तोपर्यंत खऱ्या अर्थाने देशाचा आर्थिक विकास साध्य होणार नाही हेच खरे सत्य आहे.

स्त्री पुरूष समानता चळवळी, स्वयंसेवी संस्था, उत्पादन प्रक्रिया, राष्ट्रीय विकास महामंडळ यासारख्या अनेक क्षेत्रात महिलाचे भरिव योगदान राहिलेले आहे. तरिसुध्दा महिलांच्या शिक्षणाकडे, सामाजिक समस्यांकडे, स्वास्थाकडे आजही दुर्लक्ष होताना दिसते. आज स्त्री पुरूष प्रमाणाचा विचार केल्यास स्त्रीयांच्या प्रमाणात थोडी वाढ होतांना दिसत असली तरीही स्त्री–भ्रुण हत्या पुर्ण थांबलेली आढळत नाही. महिला समक्षीकरणाच्या हेतूने २०११ मध्ये महाराष्ट्र सरकारने स्वतंत्र कायदा करून पंचायतराज व्यवस्थेत ५० टक्के आरक्षण देण्यात आले. तरी वस्तुस्थितीत महिलांना नियोजन व निर्णय प्रक्रियेत सामावुन घेतानां त्याची हेडसांड केली जाते.

महिला औपचारिक रित्या राजकारणात उतरल्या मात्र भारतीय पुरूषसत्ताक राजकारणात त्या पुरूषांच्या कंठपुतळया बनुनच राहिल्या. स्त्रियांना समोर येत असतांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले आणि आजही त्या परिस्थितीत विशेष सुधारणा झाली असे म्हणता येत नाही. भारतीय राजकारणातील सहभाग पाहता जागतीक लिंगभेद २०२१ च्या अहवालानुसार भारताचे स्थान हे २८ स्थानांनी घसरले आहे. म्हणजेच जागतीक निर्देशकांनुसार भारताचे स्थान १५६ वरून १४० झाले आहे. (World economic Foram) आज सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक यासरख्या सर्वच क्षेत्रात स्त्री आपला ठसा उमटवित असुन स्त्रीच्या सहभागाशिवाय आपल्याला विकसीत राष्ट्र म्हणुन

मिरविता येणार नाही. असे म्हटल्यास अतिशोयक्ती होणार नाही.

**स्त्री दूरीकरण आणि आर्थिक विकासभेद**

महाराष्ट्राला पुरोगामी सामाजिक व राजकीय सुधारणांची प्रदिर्घ परंपरा आहे. राजमाता जीजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी कर्वे, राजर्षी शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा असंख्य विभूतीनी महाराष्ट्राची जडण—घडण केली आहे. महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रेरणेने राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीतून ती अधिकाधिक समृध्द होत गेलेली आहे. स्वकर्तृत्वावर सत्ता मिळाल्यानंतर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वर्गीय इंदिरा गांधी यांनी स्त्री चे प्रभुत्व सिध्द केलेल आहे. तसेच देशाच्या पहिल्या पंतप्रधान म्हणुन प्रतिभाताई पाटील यांनी सन्मान मिळविला आहे.

१९४८ साली संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी हक्काची सनद तयार केली त्यातही स्त्रियांचे काही वेगळे प्रश्न अहेत आणि त्यांचा मानवी हक्कांच्या दृष्टीने उहापोह झाला पाहिजे असा विचार नव्हता त्यासाठी १९७५ हे वर्ष उजाडावे लागले. स्त्रिया मागे राहिल्यातर समाजच मागे पडत जातो. याची जाणिव होवून संयुक्त राष्ट्रसंघाने प्रथम आंतरराष्ट्रीय महिला वर्ष जाहिर केले आणि त्यांचेच पुढे महिला दशकात रूपांतर झाले. त्यांचे औचित्य साधुन भारत सरकारने डॉ. निरा देसाई यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमून समतेकडे वाटचाल हा स्त्रियांच्या परिस्थिती विषयक अहवाल तयार केला. त्यांच्या पाठोपाठ डॉ. इला भट यांनी श्रमशक्ती हा अहवाल तयार केला या दोन अहवालातून भारतीय स्त्रियांच्या परिस्थितीचे सम्यक दर्शन घडते. स्त्रियांचे शिक्षण, आरोग्य, रोजगार, विघातक सामाजिक चालिरीती, प्रथा परंपरांचा त्याच्यावर होणारा परिणाम व उपाययोजना आदि संदर्भात त्यातून ठोस मांडणी करण्यात आली. स्व. पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुढाकाराने नॅशनल प्रॉस्पिक्टिव्ह प्लॅन तयार करण्यात आला. भारतीय संविधानाच्या बरोबरीने उपरोक्त तीन दस्तऐवज स्त्रियांविषयक धोरण तयार करण्यासाठी महत्वाचे आहेत. संयुक्त राष्ट्र संघाने आपल्या सदस्यांनी एका लयीत स्त्रियांची प्रगती घडुन आणावी यासाठी आंतरराष्ट्रीय संकेत तयार केले त्यात १९७९ मधिल सिडा (Committee On the elimination of Discrimination againtst Women) हा अत्यंत महत्वाचा दस्तऐवज मानला जातो. भारत देशानेही तो स्विकारला असून स्त्रियांच्या धोरणात्मक विकासासाठी पायाभूत मानला गेला.

सामाजिक न्यायाच्या दृष्टीने विचार करता आरोग्य, शिक्षण आर्थिक — सामाजिक प्रतिष्ठा आणि सुरक्षा या बाबतीत स्त्री—पुरूषांना समान संधी असणे आवश्यक आहे. मानवी स्वास्थांच्या या विविध आयामांच्या बाबतीत आजही जगातील निम्या देशात स्त्रिया पुरूषांपेक्षा लक्षणिय रित्या मागे आहेत. एकुण लोकसंख्येच्या निम्म्या असणाऱ्या स्त्रियांच्या शैक्षणिक आणि आर्थिक क्षमतांचा पुर्ण विकास न झाल्यामुळे अर्थव्यवस्थेतील उत्पादन वाढीला खीळ बसते. म्हणजेच स्त्री पुरूषाच्या आर्थिक सामाजिक क्षमताचा समान विकास होणे गरजेचे आहे.

आज भारत आर्थिक विकासाच्या ज्या टप्प्यावर आहे. त्या तुलनेत भारतातील स्त्रि पुरूषांच्या आर्थिक आणि सामाजिक अर्हतेमध्ये खुपच अंतर आहे विकासाच्या प्रक्रियेत स्त्री — पुरूषांच्या शैक्षणिक अर्हतेतील अंतर कमी झाले असले तरी २०११ च्या जनगणनेनुसार पुरूषांमधील साक्षरतेची टककेवारी स्त्रियांपेक्षा २५ ने जास्त आहे ग्रामीण व शहरी भागात हा फरक अनुक्रमे ३३ आणि १२ टक्के आहे. शिक्षणाच्या उच्च माध्यमीक स्तरापर्यंत मुले आणि मुली यांच्या नोंदणीत समानता आली असली तरी उच्च शिक्षणाच्या बाबतीत मात्र फरक आहे. उच्च माध्यमिकच्या पुढे एकुणच नोंदणीत वाढ होणे गरजेचे आहे. भारतात स्त्री—पुरूषांच्या श्रम बाजारातल्या सहभागातील तफावत सुध्दा लक्षणिय आहे. २०११—१२ या वर्षात पंधरा वर्षा पुढील पुरूषांत हजारी ७९८ श्रमीक होते. स्त्रियांसाठी हेच प्रमाण केवळ ३१८ म्हणजेच पुरूषापेक्षा ४० टक्के कमी होते. श्रमबाजार सहभागातील स्त्री—पुरूषामधील ही तफावत ग्रामीण भागाच्या तुलनेने शहरी भागात अधिक आहे. ही तफावत आसाम, बिहार, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, पंजाब, चंदीगड या राज्यात खुपच जास्त आहे. तर हिमाचल प्रदेश, सिक्कीम, मेघालय, केरळ या राज्यात ती कमी आहे. स्त्री—पुरूष श्रमीकांच्या शैक्षणिक गुणवत्तेतही फरक आहे. माध्यमीक शिक्षीत पुरूष श्रमिकांचे प्रमाण ३४ टक्के तर हेच प्रमाण स्त्री श्रमिकांच्या बाबतीत १८ टक्के म्हणजेच जवळपास निम्मे आहेत. यामुळे पुरूषांच्या तुलनेने स्त्रिया कमी उत्पादकतेच्या कामात गुंतलेल्या दिसतात. शेती आणि बिगर शेती क्षेत्रात रोजंदारी, घरकामे, छोटया प्रमाणात विक्री आणि सेवा व्यवसाय या क्षेत्रात या क्षेत्रात स्त्रियांचे प्राबल्य दिसून येते.

वरिष्ठ अधिकार असणाऱ्या स्त्रियांचे प्रमाणही पुरूषांच्या तुलनेत निम्मे आहे. देशातील उत्पादन प्रक्रियेत इतक्या कमी प्रमाणावर आणि तेही कमी उत्पादकतेच्या क्षेत्रात स्त्रियांच्या असणाऱ्या सहभागामुळे त्यांचा जीडीपीमधील वाटा जगात सर्वात कमी म्हणजे केवळ १७

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

टक्के एवढाच आहे. जागतीक पातळीवर हा वाटा सरासरी ३७ टक्के आहे. श्रमशक्तीत अधिक स्त्रियांना आणुन अर्थव्यवस्थेतील उत्पादनाला चालना देण्याची भारताला एक चांगली संधी आहे. भारतातील सर्व उत्पादन क्षेत्रात स्त्री – पुरूषांची भागीदारी समान झाली व त्यांनी समान वेळ काम केले तर भारताच्या जी.डी.पी. मध्ये नक्कीच वाढ होईल. पण श्रमबाजारातील सहभाग हा कौटुंबिक पातळीवर घेतला जाणारा निर्णय असतो आणि हा निर्णय ज्या त्या समाजातिल सांस्कृतीक मुल्यांवर अवलंबून असतो. स्त्रियांना चांगल्या गुणवत्तेच्या रोजगारासाठी सक्षम करणे आवश्यक आहे. त्यासाठी माध्यमिक आणि उच्च शिक्षणाचा प्रसार स्त्रियांमध्ये करणे, उत्पादन व सेवा क्षेत्रसाठी कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबवणे, बॅकींग आणि संगणकीय सेवा महिला उद्योजकांना उपलब्ध करूण देणे, सुरक्षा कायदे मजबूत करणे आणि त्यांचे पालन करणे या बाबी महत्वाच्या आहेत.

स्त्रियांना अर्थार्जनासाठी घराबाहेर पडता येण्यासाठी त्यांची प्रथम घरकामातुन सुटका होणे आवश्यक आहे. राष्ट्रीय नमुना पाहणी नुसार १५ वर्षावरील जवळपास ५५ टक्के स्त्रियांच्या बहुतांश वेळ घरकाम, शिवणकाम, विणकाम, मुलांचे संगोपन आजारी व्यक्तिची शुश्रुषा यासांरख्या पंरपरात कामात आहे. यातील फक्त ३० टक्के स्त्रिया घरातुन डेअरी, टेलरिंग, खाद्यपदार्थ यासारखे व्यवसाय घरकाम सांभाळुन करायला तयार आहेत असे दिसते. स्त्रिया विनामोबद्दला करत असलेल्या या कौटुंबिक जबाबदारीच्या कामांचे गुणवतापुर्ण जीवनासाठी अनन्यसाधारण महत्व आहे या कामांची योग्य ती पर्यायी व्यवस्था झाल्याशिवाय स्त्रियांना उत्पादनन प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. हे विविध पर्याय त्यांची कार्यक्षमता तसेच विनामोबदला आणि मोबदलासहीत कामांची अर्थव्यवस्थेच्या आणि श्रमधोरणांच्या पातळीवरील सांगड याविषयीची चर्चा श्रमविषयक अभ्यासात सध्या ऐरणीवर आहे. स्त्री, पुरूषांच्या कामाच्या वाटपातील असमानता दूर करून श्रमशक्तीचा कार्यक्षम वापर वाढविण्यासाठी स्त्रियांना आर्थिक कार्यात मोठया प्रमाणात सामावून घेणे नितांत गरजेचे आहे.

**मुल्यमापन :**

स्त्रियांच्या मनात असणारी भिती, आत्मविश्वासाची कमतरता, या बाबी ज्याप्रमाणे देशाचा आर्थिक विकासापासून दूर राहण्यास कारणीभूत आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्तरावरूनच नव्हे तर राज्य, जिल्हा, तालुका, ग्राम स्तरावरून स्त्रियांचा आर्थिक सहभाग वाढविण्यास प्रयत्न होणे गरजेचे आहे. स्त्रि सहभागाशिवाय आर्थिक विकास शक्य नाही. आर्थिक सहभागाशिवाय परावलंबनाची भावना वाढीस लागते. त्यामुळे तिच्यात निर्णय क्षमता वाढीस लागत नाही तसेच योग्य प्रकारे नियोजन कार्यात ती सहभाग दर्शवु शकत नाही. स्त्रियांच्या आर्थिक क्षेत्रातील कमी सहभाग मुले अनेक समस्यांना सामोरे जावे. लागत आहे.

**उपाययोजना :**

(१) महिलांमध्ये जागृती निर्माण करणे.
(२) बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे व्यवस्थापन करणे.
(३) महिलांच्या एकंदर क्षमतांचे संवर्धन करणे
(४) महिलामधील आत्मविश्वास वृध्दीगत करणे.
(५) रोजगारांच्या संधी आणि बाजारेपण मध्ये समन्वय निर्माण करणे.
(६) शाश्वत विकासाच्या दृष्टीने निम्न स्तरावरून शासकीय प्रयत्न करणे.

**संदर्भ :**

डॉ. सिन्हा, वि.सी – आर्थिक विचार इतिहास, संजय साहित्य भवन
डॉ. ढमढेरे, एस.व्ही – भारतीय आणि जागतीक आर्थिक विकास, डायमंड पब्लीकेशन
डॉ. माहेश्वरी, पी.डी – संवृध्दी एंव विकास का अर्थशास्त्र, कैलाश पुस्तक सदन भोपाल
डॉ. गुप्ता, शिलचंद्र – उच्च आर्थिक विश्लेषण, कैलाश पुस्तक सदन भोपाल
डॉ. महाजन, मुकुंद – आर्थिक आणि सामाजिक विकास, निराली प्रकाशन
कुलकर्णी, विनायक – स्त्रियांचे अर्थभान, सकाळ पब्लीकेशन
रा.ज. लोटे – भारतातील स्थानीक स्वराज्य संस्था
https://www.idroonline.org